# रावल शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप



दोंडाईचा येथील दादासाहेब रावल शाळेच्या विदयार्थ्यांना मुंबई येथील अक्षरा सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने शैक्षणिक साहित्य वाटप करतांना जिल्हाधिकारी दिलीप पांढरपट्टे, समवेत सरकारसाहेब रावल, नगराध्यक्षा सौ. नयनकुंवरताई रावल, अक्षरा प्रतिष्ठानचे संचालक अमोल वंजारी, अजित नायर, मुख्याध्यापक सोनवणे आदी.

**दोंडाईचा । दि.४ । प्रतिनिधी**

मुबई येथील अक्षरा सामाजिक प्रतिष्ठानकडून स्वो.वि.संस्थेच्या शिक्षणमहर्षी दादासाहेब रावल खाजगी प्राथमिक शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप जिल्हाधिकारी दिलीप पांढरपट्टे यांच्याहस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरकारसाहेब रावल होते. प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्षा नयनकुंवरताई रावल, अक्षरा प्रतिष्ठानचे संचालक अमोल वंजारी, अजित नायर उपविभागीय अधिकारी नितीन गावंडे, तहसिलदार रोहिदास वारूडे, स्वो.वि.संस्थेचे सचिव सी.एन.राजपूत, सामान्य प्रशासन सचिव ललितसिंह गिरासे, प्रीतमसिंह झाल्टे, नगरसेवक रमेश पारख, प्रविण महाजन, जितेंद्र गिरासे, मुख्याध्यापक श्री.सोनवणे, श्री.जयकुमार रावल अभियांत्रिकी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ.पी.डी.पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी पांढरपट्टे म्हणाले की, प्रत्येक विदयार्थ्यांमध्ये काही ना काही गुण असतात. त्यानुसार त्या विदयार्थ्यांना विकसित केले पाहिजे, सचिन तेंडूलकर अभ्यासात जेमतेम होता, परंतू एक उत्कृष्ट खेडाळू म्हणून त्याने सर्व जगात भारत देशाचे नांव कमविले. पालकांना यानिमीत्ताने मी एक आवाहन करतो की, कोणत्याही मुलांना शाळाबाहय होवू देवू नका, आजकाल मुलांपेक्षा मुलींच टक्केवारीत पुढे येत आहेत, त्यामुळे मुलींच्या शिक्षणांवर देखील विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे जिल्हाधिकारी दिलीप पांढरपट्टे यांनी यावेळी व्यक्त केले.दरम्यान, यावेळी अक्षरा प्रतिष्ठानचे वंजारी यांनी दरवर्षी मुलांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा संकल्प केला तर सरकारसाहेब रावल यांनी देखील यावेळी मार्गदर्शन केले. सुत्रसंचालन डी.एस.गिरासे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक एम.एस.सोनवणे, आर.एन.घोडके, एम.बी.गिरासे, डी.ए.कुंवर, इंदिरा रावल, रेखा ठाकूर, एम.एच.वंजारी, आर. व्ही गिरासे श्री.चव्हाण यांनी परीश्रम घेतते.